**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक २५ जानेवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **भारतीय उत्पादनात गुणवत्तेला प्राधान्य देण्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं 'मन की बात' मधून आवाहन.**
2. **राज्यासह देशभरात आज राष्ट्रीय मतदार दिनाचा उत्साह.**
3. **अग्निशमन दल, होमगार्ड, नागरी संरक्षण आणि सुधारगृह सेवांमधल्या ९८२ कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदकं प्रदान; महाराष्ट्रातल्या ७५ जणांचा समावेश.**
4. **७७ वा प्रजासत्ताक दिन सोहळा उद्या नागपुरात कस्तुरचंद पार्क इथं पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत साजरा होणार.**

मन कि बात

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज आकाशवाणीवरच्या मन की बात कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच देशवासियांना उद्या साजरा करण्यात येणाऱ्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. स्टार्ट-अप इंडियाचा प्रवास आणि गुणवत्तेला प्राधान्य या विषयावर बोलताना ते म्हणाले की भारतीय उत्पादनाचा अर्थच उच्च दर्जा, असा झाला पाहिजे. उत्कृष्टतेला आपण आपला मानदंड बनवू या असं आवाहन त्यांनी केलं. आज राष्ट्रीय मतदार दिन आहे. मतदार हा लोकशाहीचा आत्मा असतो, असं सांगत पंतप्रधानांनी नवयुवकांना मतदार म्हणून नाव नोंदणी करण्याचं आवाहन केलं. -

***मतदाता ही लोकतंत्र की आत्मा होता है। इसलिए बहुत जरूरी है कि हम देश में वोटर बनने का, मतदाता बनने का उत्सव मनाएँ। आज मतदाता दिवस पर मैं अपने युवा साथियों से फिर आग्रह करूँगा कि वे 18 साल का होने पर वोटर के रूप में खुद को जरूर रजिस्टर करें। संविधान ने हर नागरिक से जिस कर्तव्य भावना के पालन की अपेक्षा रखी है। इससे वो अपेक्षा भी पूरी होगी और भारत का लोकतंत्र भी मजबूत होगा।***

उत्तर प्रदेशातल्या आझमगडमधून वाहणार्या तमसा नदीची क्षमता, आंध्र प्रदेशच्या अनंतपूरमधील 'अनंत नीरू संरक्षणम प्रकल्प', Genz मध्ये लोकप्रिय 'भजन क्लबिंग', मलेशियात भारतीय भाषांच्या शाळा चालविणाऱ्या भारतीय बांधवांचे आणि 'Malaysia India Heritage Society' या संस्थेचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. गुजरातमधील बेचराजी येथील चंदनकी गावातील कम्युनिटी किचन अर्थात सामुदायिक स्वयंपाकघर, युएईच्या हे वर्ष कुटुंब वर्ष म्हणून साजरा करण्याचा उपक्रम, अनंतनागमधील शेखगुंडमधील अंमली पदार्थ विरोधी मीर जाफरजी यांची मोहीम, पश्चिम बंगालच्या पूर्व मेदिनीपूरमधील फरीदपूर इथं कार्यरत 'विवेकानंद लोक शिक्षा निकेतन', अरुणाचल प्रदेश, कर्नाटक आणि आसाममधील युवकांचे स्वच्छता अभियान, मध्य प्रदेश आणि पश्चिम

बंगालमधील युवकांचे स्वयंस्फूर्त पर्यावरण संवर्धन इत्यादी उपक्रमांचा त्यांनी कौतुकास्पद उल्लेख केला.

## मतदार दिन

आज राष्ट्रीय मतदार दिन सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात येत आहे. भारतीय लोकशाहीत नागरिकांची मध्यवर्ती भूमिका ठळकपणे मांडणारी My India, My Vote ही यंदाची संकल्पना आहे. भारत निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी झाल्याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. मतदारांचं महत्त्व अधोरेखित करणं, निवडणूकांविषयी जनजागृती वाढवणं आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभागासाठी प्रोत्साहित करणं हा या दिनाचा उद्‌देश आहे. या निमित्तानं नवी दिल्ली इथं झालेल्या

## राष्ट्रीय कार्यक्रमाला

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संबोधित केलं. मतदानाच्या अधिकारासोबतच, प्रत्यक्ष मतदान करणंही तितकंच महत्वाचं असतं असं त्यांनी सांगितलं. देशाचे मतदार प्रलोभन, खोटी माहिती तसंच दुष्प्रचाराला बळी न पडता आपल्या विवेकबुद्धीनं देशाच्या निवडणूक व्यवस्थेला सुदृढ बनवतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आज अनेक ठिकाणी मतदार दिनानिमित्त जागृतीपर कार्यक्रम घेण्यात आले. वर्धा जिल्ह्यातील SSNJ महाविद्यालयातील एनसीसी विभाग आणि मेरा युवा भारत कार्यालयातर्फे आज रॅली काढून जनजागृती करण्यात आली आणि मतदार जागृतीच्या घोषणा देण्यात आल्या.

## एस. चोक्कलिंगम

मतदार नोंदणी अधिकारी यांनी मतदार नोंदणीला मंजुरी दिल्यानंतर १५ दिवसांत संबंधित मतदाराला मतदार ओळखपत्र मिळेल, असे नियोजन करण्यात येत असल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी आज नाशिक येथे दिली. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, आणि जिल्हा निवडणूक अधिकारी, नाशिक यांच्या संयुक्त विद्‌यमाने १६ व्या राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त राज्यस्तरीय मतदार दिनाचा कार्यक्रम आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते.

## शौर्य पदक

प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस, अग्निशमन दल, होमगार्ड, नागरी संरक्षण आणि सुधारगृह सेवांमधील ९८२ कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदकांनी सन्मानित करण्यात आलं आहे. १०१ कर्मचाऱ्यांना राष्ट्रपतींचं विशिष्ट सेवा पदक आणि ७५६ कर्मचाऱ्यांना गुणवत्तापूर्ण सेवा पदकं प्रदान केली गेली. समर्पित आणि निष्ठावान सेवेसाठी ही पदकं प्रदान केली जातात. यापैकी १२५ कर्मचाऱ्यांना शौर्य पदकं देण्यात आली असून ही दुर्मिळ शौर्यपूर्ण कृत्यांसाठी दिली जातात. यात महाराष्ट्राच्या पोलीस

आणि सुरक्षा दलातल्या ७५ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. याबाबत अधिक माहिती जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधींकडून -

*महाराष्ट्रातील अधिकारी कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या पदकांमध्ये ३१ शौर्यपदकं, उल्लेखनीय सेवेसाठीची ४ राष्ट्रपती पदकं आणि गुणवत्तापूर्ण सेवेसाठीच्या ४० पदकांचा समावेश आहे. सीबीआयमधल्या ३१ अधिकाऱ्यांना पोलीस पदकं प्रदान करण्यात आली. कोलकाता इथल्या आर. जी. कार वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टर हत्याप्रकरण आणि विचारवंत नरेंद्र दाभोळकर हत्या प्रकरणाच्या तपासाचं नेतृत्व करणाऱ्या अधिकाऱ्यांचा यात समावेश आहे. सीबीआयचे संयुक्त संचालक व्ही. चंद्रशेखर यांना राष्ट्रपतींचं विशिष्ट सेवा पदक देण्यात आलं असून, २५ अधिकाऱ्यांना गुणवत्तापूर्ण सेवा पदक जाहीर झालं आहे. अकोला जिल्ह्यातील जात पडताळणी विभागात दक्षता पथकात कार्यरत असलेले पोलिस उपअधीक्षक गजानन शेळके यांना त्यांच्या उल्लेखनीय, कर्तव्यदक्ष आणि समाजाभिमुख पोलिस सेवेबद्दल राष्ट्रपती पोलिस पदक जाहीर करण्यात आल आहे. गजानन शेळके यांनी आपल्या ३३ वर्षांच्या पोलिस सेवाकाळात भंडारा, अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशीम आदी जिल्ह्यांमध्ये विविध पदांवर काम करत प्रभावी ठसा उमटवला आहे. त्यांच्या "पोलिस मित्र" संकल्पना, "एक कॉल करा, मदत मिळवा" सारख्या उपक्रमांमुळे नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ झाला. कोरोना काळात "नो मास्क, नो सवारी" ही मोहीम राबवून त्यांनी सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका बजावली होती.*

राष्ट्रपती संबोधन

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला, आज संध्याकाळी ७ वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू देशाला संबोधित करणार आहेत. त्यामुळे आकाशवाणी मुंबई केंद्रावरून रोज संध्याकाळी ७ वाजता प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र आज ६ वाजून ४५ मिनिटांनी प्रसारित होईल.

कस्तुरचंद पार्क

७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त उद्या २६ जानेवारी रोजी ध्वजवंदनाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यभर एकाच वेळी सकाळी सव्वा नऊ वाजता आयोजित करण्यात येणार आहे. या मुख्य शासकीय समारंभात निमंत्रितांना सहभागी होता यावं, यासाठी या दिवशी सकाळी साडे आठ ते दहा या दरम्यान ध्वजवंदनाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अर्ध शासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये. जर एखाद्या कार्यालयास अथवा संस्थेला आपला स्वत:चा ध्वजवंदन समारंभ करावयाचा असल्यास त्यांनी तो समारंभ सकाळी साडे आठच्या पूर्वी किंवा १० वाजेनंतर करावा, असं राजशिष्टाचार विभागामार्फत परिपत्रकाद्वारे कळवण्यात आलं आहे. दरम्यान नागपुरात भारतीय प्रजासत्ताकाचा ७७ वा वर्धापन दिन समारंभ २६ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता कस्तुरचंद पार्क इथ राज्याचे महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा होणार आहे. या सोहळ्यात नागपूर महानगरपालिकेच्या

शाळांतील ११० विद्यार्थी देशभक्तीपर गीतावर नृत्य सादर करणार असून संजयनगर आणि विवेकानंदनगर हिंदी माध्यमिक शाळेचे विद्यार्थी पथसंचलनात सहभागी होणार आहेत. तसच
सायंकाळी ५.३० वाजता आर. एस. ए. मुंडले हायस्कूल इथं सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

शंकर पट

अमरावती जिल्ह्यातील बहिरम येथे सातपुडा श्री क्षेत्र बहिरम बाबा यात्रेच्या निमित्ताने आयोजित "आमदार हिंद केसरी बैलगाडा शर्यती" रंगस मैदानात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या वर्षीच्या शर्यतीत अवघ्या सहा सेकंदांत यवतमाळ आणि हिंगोलीच्या शेतकऱ्यांच्या बैल जोड्यांनी विजय मिळवून मोटरसायकल पटकावली. अधिक माहिती देत आहेत आमचे प्रतिनिधी-

शहीदी समागम

श्री गुरु तेग बहादुर साहीबजी यांच्या साडेतीनशेव्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड इथल्या मोदी मैदान इथं शहिदी सत्संग सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. राज्य शासनाचा अल्पसंख्यांक विकास विभाग आणि राज्यस्तरीय समागम समितीच्यावतीने नांदेड येथील मोदी मैदानावर आयोजित कार्यक्रमात लाखो भाविकांनी गुरुचरणी माथा टेकवत श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या बलिदानाचं स्मरण केलं. विविध राज्यांसह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या भाविकांमुळे नांदेड शहर भक्तिमय झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नांदेडमध्ये श्री सचखंड गुरुद्वाराचे दर्शन घेतले. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान, आंध्रप्रदेशचे उपमुख्यमंत्री कोनिडला पवन कल्याण, महाराष्ट्राचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन,माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांनीही या कार्यक्रमाला उपस्थिती लावत दर्शन घेतले.

*****